# 'महात्मा गांधींचे लैंगिक विचार आणि ब्रह्मचर्य संकल्पनेचा चिकित्सात्मक अभ्यास'

**अरविंद अनिल घोडके,** सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, न्यू कॉलेज, कोल्हापूर.

.........................................................................................................

**प्रस्तावना:**

महात्मा गांधींचे लैंगिकतेसंबंधीचे विचार धर्म, नितीमत्ता आणि भारतीय परंपरेच्या पायावर आधारलेले होते. त्यांचे लैंगिकतेचे विचार, अनुभव आणि ब्रह्मचर्य पालनासाठी केलेल्या प्रयोगांची माहितीत्यांच्या 'माझे सत्याचे प्रयोग' या आत्मचरित्रातून मिळते. त्यांचे संकलित साहित्य आणि त्यांच्या सहकाऱ्यांशी झालेल्या पत्रव्यवहारातून त्यांचा लैंगिकतेकडे पाहण्याचा दृष्टिकोन स्पष्ट होतो.गांधीजी पत्नीबरोबरच्या खाजगी वैवाहिकजीवनाविषयी स्पष्टपणे लिहितात. वैवाहिक जीवनातील शारीरिक संबंध आणि स्वतःच्या लैंगिकतेकडे निकोप दृष्टीने न पाहता वासना किंवा विकार म्हणून पाहतात याची जाणीव होते.ते स्वतःला कामातुर आणि विषयांध समजून अपराधी वाटून घेतात. लैंगिकतेच्या दमनासाठी ब्रह्मचर्याचे व्रत स्वीकारून मनामध्ये लैंगिक विचार उत्पन्नच होऊ नयेत यासाठी प्रयोग करतात. स्वतःचे ब्रह्मचर्य तपासण्यासाठी स्त्रियांच्या सहवासात राहतात. कठोर उपवास आणि विशिष्ट आहारातूनच ब्रह्मचर्य प्राप्ती होते असे प्रतिपादन करतात. ब्रह्मचर्य पालनातून मोक्ष प्राप्तीची अपेक्षा ठेवतात. या गोष्टीतून त्याचा लैंगिक दृष्टिकोन समजण्यास मदत होते.

गांधींच्या लैंगिक विचारांचे आणि त्यांनी इंद्रियदमनासाठी केलेल्या प्रयोगांचे काळाच्या, अनुभवाच्या आणि विज्ञानाच्या कसोटीवर विश्लेषण आणि चिकित्सा होणे गरजेचे आहे.गांधीजींच्या लैंगिक विचाराकडे महात्म्याचे विचार म्हणून न पाहता गांधी नावाच्या माणसाचे विचार म्हणून त्याची चिकित्सा होणे अधिक अपेक्षित आहे.प्रस्तुत शोध निबंधात महात्मा गांधींच्या लैंगिक विचार आणि ब्रह्चर्य संकल्पनेचा अभ्यास चिकित्सात्मक दृष्टिकोनातून करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**संशोधन हेतू :**

१. महात्मा गांधींच्या लैंगिकतेसंबंधीच्याविचारांचा अभ्यास करणे .

२. महात्मा गांधींच्या लैंगिकतेसंबंधीच्याविचारांचे चिकित्सात्मक विश्लेषण करणे.

**संशोधन पद्धती :**

सदर शोध निबंध लिहिण्यासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे.

**संशोधन सामग्री:**

प्रस्तुत शोध निबंध लिहिण्यासाठी दुय्यम साधन सामग्रीचा वापर करण्यात आलेला आहे. यामध्ये उपलब्ध संदर्भ ग्रंथ, शोध निबंध, मासिके या सामग्रीचा आधार घेण्यात आलेला आहे.

**आशय विश्लेषण :** अन्न, वस्त्र, निवारा आणि लैंगिकता या शारीरिक गरजा आहेत. नैसर्गिक प्रेरणा आहे.त्यांची पूर्तता होणे आवश्यक आहे. भारतीय समाजात माणसाच्या लैंगिकतेकडे मात्र धार्मिक, नैतिक, संकुचित आणि हीन दृष्टीकोनातूनच पहिले गेले. भारतीय समाजव्यवस्थेत लैंगिकतेवर उघडपणे चर्चा करणे निषिद्ध मानले. लैंगिकतेलानीतिमत्तेच्या परिमाणात बंदिस्त केले. लैंगिकतेची अशुद्ध, अपवित्र, वासना आणि विकार मानून हेटाळणीच केली. स्त्री-पुरुष संबंधाकडे वैज्ञानिक दृष्टिकोनातून न पाहता धार्मिक व नैतिक दृष्टिकोनातून पाहिले. परिणामीभारतीयांच्यातलैंगिकतेसंबंधी वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होऊ शकला नाही. गांधींजीही याला अपवाद कसे होऊ शकले असते? गांधीजीनीही लैंगिकतेकडे याच धार्मिक, नैतिक मनोवृत्तीतून आणि दृष्टिकोनातून पाहिले.

**महात्मा गांधीचे लैंगिकतेसंबधीचे स्वानुभव आणि विचार :** माझ्या पत्नीच्या बाबतीत मी विषयासक्त होतो. शाळेतही तिचे विचार येत. रात्र केव्हा पडते, आमची भेट केंव्हा होते हाच विचार सारखा चाले. वियोग असाहय वाटे.[१]पत्नीला दिवस गेले. ही गोष्ट दोन प्रकारे लाजिरवाणी होती हा काळ विद्याभ्यासाचा असताना संयम राखला नाही. बालपणापासून 'श्रावण' माझा आदर्श होता असे असूनही 'विषय' माझ्या मनावर सत्ता चालवू शकत होता.[२]एखाद्या व्यक्तीला आदर्श म्हणून स्वीकारणे आणि तिच्या सारखे वागणे यामध्ये संघर्ष आहे. आदर्श म्हणून स्वीकारत असताना स्वतःचे व्यक्तिमत्व आणि स्व-प्रेरणा बाजूला पडतात. स्व-प्रेरणांचे दमन करून फक्त

आदर्शासारखे वागत आले नाही म्हणून गांधींचे स्वतःला दोष देणे योग्य वाटत नाही.गांधी ज्या वयात होते त्या वयानुसार त्यांच्या शरीरातील लैंगिक प्रेरणा ही प्रबळ असणारच. यासाठीगांधीना विवाहाच्या माध्यमातून जोडीदार मिळाला होता.त्यांचे जोडीदाराकडून लैंगिक गरजांचे शमन करणे निसर्गाला आणि समाज नियमांना धरूनच होते. गांधीजी या कृत्यासाठी स्वतःला दोष देतात. त्यामुळे त्यांची तत्कालीन लैंगिकतेसंबंधीची ही भूमिका 'आदर्शा'शी प्रतारणा केल्याच्या भावनेतून आणि वयाच्या अपरिपक्वतेतून आल्याचे दिसून येते.

वडिलांचे पायाचे चेपीत असताना मन शयनगृहाकडे धाव घेत असे. तेही अशावेळी जेव्हा धर्मशास्त्र, वैदिकशास्त्र आणि व्यवहारशास्त्र यांच्या दृष्टीने 'स्त्रीसंग' वर्ज होता.[३]स्त्रीसंग हा वाईट असतो किंवा स्त्रीसंग वर्ज करावा ही त्यांची भूमिका धार्मिक ग्रंथांच्या प्रभावातून निर्माण झालेली दिसून येते. लैंगिकतेसंबंधीचे मते तत्कालीन धर्मग्रंथावर आधारलेली होती हे वरील विधानावरून स्पष्ट होते.

वडिलांच्या शेवटच्या क्षणी त्यांची सेवा करण्याची सोडून आपण कामातिरेकाने शयनगृहात गेलो. विषयांध झालो. शेवटच्या क्षणी वडिलांचे भेट झाली नाही याचे शल्य त्यांना होते. मी विषयांद नसतो तर शेवटच्या घडीला माझ्या नशिबी वियोग आला नसता.[४]वडिलांच्या सेवेच्या वेळी विषयेच्छा निमार्ण झाली ही गोष्ट त्यांना कायम बोचत राहिली. माता पित्यांच्या सेवेच्या प्रसंगी माझे मन विषयाला सोडू शकत नव्हते.[५]लैंगिक विचार मनात येण्यासाठी वेळ, स्थळ वा काळाचे बंधन असते असेमानणे चुकीचे ठरेल. असे विचार मनात कधीही निर्माण होऊ शकतात. त्यामुळे आई वडिलांची सेवा करीत असताना मनात लैंगिक विचार येणारच नाहीत असे म्हणता येणार नाही.

पत्नीला अक्षर ज्ञान असलेच पाहिजे आणि मीच ते देईन असा त्यांचा विचार होता. परंतु माझ्या 'विषया'साठी पुढे ते काम बाजूला पडण्याची कबुली गांधीजी देतात.मी जागृत झाल्यानंतरही दोन वेळा हरलो. प्रयत्न करी, पण फसे. प्रयत्नातील मुख्य हेतू फारसा उच्च नव्हता. प्रजोत्पती थांबविण्याचा होता. प्रजोत्पतीची अनावश्यकता लक्षात येताच मी संयमपालनाचा प्रयत्न सुरु केला. गांधीजी शरीर संबंधाना प्रजोत्पादनापुरते मर्यादित करतात. स्त्री शरीर संबंधाना फक्त प्रजोत्पादनापुरते मर्यादित करणे चुकीचे ठरेल. गांधींचा हा उपयुक्ततावादी दृष्टिकोन वाटतो. मुलांना जन्म दिल्यानंतरही लैंगिक गरज अस्तित्वात असतेच. त्याची पूर्तता करणे हे नैसर्गिकच आहे.

संयमपालन कल्पनेपलिकडे बिकट आढळले. स्वतंत्र खाटा ठेवल्या. रात्री थकून गेल्यानंतर झोपण्याचा प्रयत्न केला. या सर्व प्रयत्नांचा लागोपाठ विशेष उपयोग जाणवला नाही.गांधींची लैंगिक प्रेरणा प्रबळ असताना कृत्रिम उपायांनी गांधीजी तिचे दमन करू पाहत होते. त्यात त्यांना अपयश आले. लैंगिकता ही नैसर्गिक आहे ही गोष्ट त्यांनी दुर्लक्षित केलेली दिसते.परस्त्रीला पाहून विकार वश झाल्याचा आणि तिच्याबरोबर खेळ खेळण्याची इच्छा झाल्याचा हा पहिलाच प्रसंग होता असे मला जाणवले.त्या बाईला पाहून माझ्या मनात तीळ मात्र विकार जागृत झाला नाही याबद्दल मी ईश्वराचे आभार मानले. माझ्या बचावाबद्दल मला फक्त ईश्वराचाच पाडमानला पाहिजे.[६] एखाद्या स्त्रीला पाहून मनात लैंगिक विचार न येण्याचा आणि ईश्वराचा कोणताही संबंध लावता येणार नाही.

मी पत्नीशी कोणत्या स्वरुपाचा संबंध ठेवावा? पत्नीला विषयभोगाचे वाहन बनविणे यात पत्नीबद्दलची निष्ठा कोठे आली? मी जोपर्यंत विषयवासनेच्या आधीन आहे तोपर्यंत माझ्या एकनिष्ठेची किंमत स्वाभाविक वासनेपलिकडे करता येत नाही. येथे मला कबूल केले पाहिजे की, आमच्यामधील संबंधामध्ये पत्नीकडून आक्रमण कधीच झालेले नाही. त्या दृष्टीने मी मनात आणीन तेंव्हा ब्रह्मचर्याचे पालन करणे शक्य होते. माझी स्वत:ची दुर्बलता किंवा आसक्तीच माझ्या आड येत होती.पत्नीला अपेक्षित शारीरिक सुख देणे यात निष्ठा अथवा अनिष्ठेचा प्रश्नच उद्भवत नाही. उलट तिला शारीरिक सुखापासून वंचित ठेवणे ही पत्नीशी अनिष्ठाच होईल. स्व: पत्नीशी प्रतारणा करून परस्त्रीशी संग झाला असता तर गांधींच्या निष्ठेवर प्रश्न चिन्ह निर्माण झाले असते. तसे येथे झालेले नाही.शारीरिक गरजेला 'वासना' संबोधणे आणि ती गरज पत्नीकडून पूर्ण करून घेण्याला 'वासनांध' संबोधणे हेही संयुक्तिक वाटत नाही. जसे गांधीजी संबोधतात.

**ब्रह्मचर्याचे व्रत :** ब्रह्मचर्य म्हणजे कायावाचामनेकरून सर्व इंद्रियांचा संयम होय. ब्रह्मचर्यामध्ये शरीररक्षण,बुध्दीरक्षण आणि आत्म्याचे रक्षण आहे.ब्रह्मचर्याचे पालन म्हणजे ब्रह्मदर्शन होय.हे व्रत घेण्याच्या

वेळेपर्यंत मी पत्नीचा विचार घेतला नव्हता. तो व्रताच्या वेळी घेतला. तिच्याकडून मला यत्किंचितही विरोध झाला नाही. गांधीजी भारतीय पुरुषसत्ताक व्यवस्थेतून आलेले होते त्यामुळे पुरुषत्वापुढे स्त्रीत्व गौण ठरणे अपेक्षितच आहे. त्यांनी नमूद केल्याप्रमाणे शारीरिक संबंधात त्यांचे वर्चस्व होते. यामध्ये पत्नीची इच्छा दुय्यम होती. लैंगिकतेच्या बाबतीत भारतीय स्त्री आजही खुल्यापणाने आपली इच्छा व्यक्त करू शकत नाही. यात कस्तुरबाही वेगळ्या कशा ठरतील!शारीरिक संबंधात स्त्रियांचे पती इच्छेला विरोध करण्याचे धाडस धर्माने काढून घेतल्यामुळे गांधींना पत्नीकडून विरोध होणे शक्यच नव्हते. याचा अर्थ गांधींच्या ब्रह्मचर्यव्रतास कस्तुरबांचा पाठिंबा होता असे ठोसपणे म्हणता येणार नाही.

**उपास आणि ब्रह्मचर्य :** गांधींच्या मते ब्रह्मचर्य पालनासाठी बाह्य उपचारांमध्ये अन्नाचे प्रकार व प्रमाण यांची मर्यादा सांभाळणे आवश्यक आहे. इंद्रिय दमनाच्या हेतूने स्वेच्छापूर्वक केलेल्या उपासांची इंद्रिय दमनाला फार मदत मिळते.उपासाबरोबर मनाचाही संयम आवश्यक आहे. मनुष्याचे मनही देहदमनाला दुजोरा देत असेल तेथेच उपवासाचा उपयोग होणार. म्हणजे मनाला विषयोपभोगाबद्दल विरक्ती उत्पन्न झाली असली पाहिजे. विषयाची पाळीमुळे मनात पसरलेली असतात पण उपवासाशिवाय विषायासक्तीची पाळेमुळे सुद्धा नष्ट करणे शक्य नाही म्हणून ब्रह्मचर्य पालनाचे उपवास हे एक अनिवार्य अंग आहे असे ते मानतात.

**ब्रह्मचर्य पालनासाठीविशिष्ट आहाराचा प्रयोग:** गांधीजी इंद्रिय दमनासाठी अन्नाचे महत्त्व अधोरेखित करतात. मी स्वतः सहा वर्षाच्या अनुभवाने ठरवले की ब्रह्मचाऱ्याचा आहार वरपीक फळ हाच होय. फलाहारामुळे त्यांनी जी निर्विकारता अनुभवली. ती आहारातील फेरफारामुळेच असे ते मानतात. फलाहाराच्या अवधीत ब्रह्मचर्य सहज होते असे सांगत असताना दुसरीकडे आहाराचा ब्रह्मचर्यावर किती कसा परिणाम होतो याबाबतीत पुष्कळ प्रयोगांची आवश्यकता आहे असेही नमूद करतात.गांधींच्या आहार आणि ब्रह्मचर्याचा प्रत्यक्ष संबंध जोडण्यास कोणताही शास्त्रीय आधार देता येत नाही. गांधीजी स्वतः याबाबत प्रयोगांची आवश्यकता असल्याचे स्पष्ट करतात. फलाहारामुळे शरीर सुदृढ होण्यास मदत होईल. आरोग्य उत्तम राहील. मात्र त्यामुळे ब्रह्मचर्य वृदिंगत होईल असे म्हणणे शास्त्रशुद्ध ठरणार नाही. गांधींनीही याबाबत आशंकाच व्यक्त केलेली आहे.ज्यावेळी गांधीजींचा ब्रह्मचर्याचा बेत यशस्वी झाला तेव्हा म्हणजे १९०६ साली त्यांचे वय ३७ वर्षाचे होते. सदतीस वर्षे म्हणजे म्हातारपण नव्हे हे खरे. तथापि ज्या व्यक्तीने तेराव्या वर्षी आसक्तीने विषय उपभोगास सुरुवात केली त्याची कामवसाना २४ वर्षे उपभोगाने कमी झाल्यास मोठेसे नवल समजता येत नाही, आणि तो फलाहाराचा परिणाम समजण्यास आधार नाही.[७]

गांधीजीनी त्यांच्या सहवासातील स्त्रियांच्या माध्यामतून आपले ब्रह्मचार्याचे प्रयोग केले. इंद्रियदमन करण्यासाठी त्यांना अनेक स्त्रियांचे सहकार्य लाभले. स्त्रियांच्या सान्निध्यात राहून गांधी आपला मनोनिग्रह तपासत होते. हे जरी खरे असले तरी त्यांच्या सान्निध्यात आलेल्या स्त्रिया त्यांचा मनोनिग्रह तपासण्यासाठी किंवा ब्रह्मचर्य जपण्यासाठी आलेल्या नव्हत्या हे विसरता कामा नये.[८]

**गांधींच्या लैंगिक विचारांची चिकित्सा वा विश्लेषण :** गांधींचा विवाह वयाच्या तेराव्या वर्षी झाला. तत्कालीन समाज व्यवस्थेनुसार हा बालविवाह होता. साधारण वयाच्या १३ ते १४ व्या वर्षी मुला मुलींमध्ये लैंगिकतेचा उगम होतो. समाजीकरणातील ही 'पौगंडावस्था' अवस्था तर लैंगिक विकासातील ही 'हेट्रोसेक्सशुल स्टेज'[९]म्हणून ओळखली जाते.या वयात मुलींना मासिक पाळी तर मुलांमध्ये पुरुषत्वाची लक्षणे दिसू लागतात. नैसर्गिकपणे मुला-मुलींना विरुद्धलिंगी व्यक्तीबद्दल आकर्षण निर्माण होते. शरीरातील वाहत्या संप्रेरकामुळे शरीरात विविध बदल घडून येतात. लैंगिक इच्छा, विचार, स्वप्न, उत्तेजना आणि त्यांचे शरीरावर उमटणारे परिणाम यांची तीव्र जाणीव होऊ लागते.[१०]गांधीजी ही त्यांच्या वयानुसार पौगंडावस्थेत होते.त्यांची ही लैंगिक अवस्थेतील 'हेट्रोसेक्सशुल स्टेज'मध्ये होते.

त्यामुळे त्यांचे लैंगिकतेसंबंधीचे बहुतांशी विचार पौगंडावस्थेतील दिसून येतात. त्यांच्या एकूणच लैंगिकतेकडे पाहण्याच्या दृष्टिकोनावर तत्कालीन समाजव्यवस्था, कुटुंबव्यवस्था आणि धर्मव्यवस्थेचा गडद प्रभाव दिसून येतो. त्यांनी आपल्या आत्मचरित्रात त्यांचे वैवाहिक अनुभव, पत्नीबरोबरचे लैंगिक संबंध आणि एकूणच

लैंगिकतेकडे बघण्याचा दृष्टिकोन यावर खुलेपणाने लिहिले आहे. त्यांचे विषयासक्त असणे यात काहीही वावगे नव्हते. प्राणी शास्त्रज्ञांच्या मते सर्व प्राणीमात्रात माणूस हाच सर्वाधिक कामवासना असलेला प्राणी आहे.

गांधीजींचा तर बालविवाह झालेला होता. वयाच्या १४-१५ वर्षापासून त्यांनी कामोपभोगाची तीव्र इच्छा होती. त्यांनी ती मनोसोक्त भोगली. त्यांची पत्नी कस्तुरबाबाई हिच्या मनाचा विचार न करता, कधी कधी त्यांना झोपेतून उठवून बळजबरीने. हे त्यांनी स्वतः त्यांच्या आत्मकथेत लिहून ठेवले आहे. त्यांना कामवासनेचा तिटकारा येण्यापाठीमागे त्यांच्या वडिलांच्या निधनाच्या वेळी निर्माण झालेलीअपराधीपणाची भावना असल्याचे म्हटले जाते.[११]यातूनच त्यांनी कामवासनेचा सतत निषेध केला असे मानले जाते. गांधींचा विचारविकास धर्माच्या अंगाने होत गेल्यामुळे त्यांचा पिंड धार्मिक बनणे साहजिक होते. धर्माने माणसाला आनंद देणाऱ्या सर्व गोष्टी निषिद्ध ठरवल्या. त्यात कामवासना आलीच. त्याला पर्याय ब्रह्मचर्याचे पालन सांगितले. [१२]

गांधीजींचे १९०६ सालानंतरचे जगणे हे नैसर्गिक नव्हते. कारण ते त्यानंतर निसर्गाने माणसाला दिलेल्या नैसर्गिक प्रेरणांच्या पूर्णपणे विरुद्ध होते. एका अर्थाने त्यांनी त्याविरुद्ध एक निर्णायक लढाच उभा केला होता. त्यांनी ब्रह्मचर्याचे व्रत जाहीर करून कामवासनेच्या विरुद्ध तर उपवासाचे शस्त्र उभारून अन्नाच्या विरुद्ध नैसर्गिक भुकांच्या विरुद्ध ते उभे राहिले. शरीरात कामवासना निर्माण होऊ नये म्हणून आहारात अनेक गोष्टी वर्ज्य केल्या.[१३]

गांधींच्या जीवनात पेच निर्माण झाला तो तीव्र कामवासनेकडून सत्याकडे, ईश्वराकडे जाण्यासाठी प्रवास करताना. त्यांचा हा प्रवास जेंव्हा सुरू झाला तेव्हा त्या प्रवासात कामवासनेचे काही अंश शिल्लक उरले होते,हे त्यांनी स्वतःच कबूल केली होते. परंतु कामवासनेचे जे अंश गळाले होते ते नेमके कुठे गेले होते? कामवासना जर मानवनिर्मित असती तर गांधीजी तिला सहज सोडू शकले असते. परंतु तसे होऊ शकले नाही. कारण ती त्यांची इतर माणसाप्रमाणेच नैसर्गिकप्रेरणा (Natural Instinct)होती. ज्याप्रमाणे एखादी व्यक्ती पूर्ण अन्न त्याग करून फार काळ जगू शकत नसते कारण अन्न त्याची नैसर्गिक प्रेरणा असते त्याचप्रमाणे कामवासना पूर्णपणे त्यागणे अशक्य असते. [१४]

**सारांश :** गांधीजींचा ब्रह्मचर्याचा दृष्टिकोन मुळातच सदोष होता. ना तो धार्मिक परंपरेत रुजलेले होता, ना अनुभवजन्य पुराव्यांद्वारे सिद्ध करता येत होता.त्यांनी लैंगिकता आणि ब्रह्मचर्य या प्रश्नाकडे निव्वळ पुरुषी दृष्टिकोनातून कोनातून पाहिले. गांधीजीमहात्मा होण्याअगोदर एक हाडामांसाचा भावभावनांनी युक्त साधारण माणूस होते. त्यांचे लैंगिक विचार समजून घेणे म्हणजे त्यांचे 'माणूसपण' समजून घेणे अधिक संयुक्तिक होईल. महात्मे भावनाविरहीत असू शकत नाही. गांधीही त्याला अपवाद कसे असतील. इतर माणसांप्रमाणे त्यांनाही भूक, वासना, सुख, दुःख, प्रेम, ईर्षा, महत्त्वकांक्षा इत्यादी सर्व गोष्टी असतातच.गांधीनाही होत्या. त्यामुळे गांधींच्या लैंगिक विचाराकडे पाहताना त्यांना महात्मा म्हणून न पाहता माणूस म्हणून पाहणे गरजेचे आहे. निदान तसा प्रयत्न करणे होणे आवश्यक आहे. गांधीजींना दैवी अवतार मानणेही चुकीचे होईल. कारण भारतीय संस्कृतीत देवदेवताही नैसर्गिक प्रेरणांनी युक्त होत्या. त्यांची परिपूर्ती करीत होत्या. गांधीजीनीही त्या केल्या. त्यांनी लैंगिकता आणि ब्रह्मचर्य संबंधी केलेले प्रयोग धाडसी होते. ज्याची वाच्यता त्यांनी खुलेपणाने समाजासमोर केली. त्यांची लैंगिकता नीतीनियमांच्या, नैतिक अनैतिकतेच्या, पाप पुण्याच्या, ब्रह्मचार्य संकल्पनेच्या आणि नियमांच्या परिपेक्षात बसणारी होती. त्यांची नैतिक आणि पुरुषसत्ताक होती. असले तरी त्यात कोणताही अभिनिवेष दिसत नाही. उलट त्यांच्यामध्ये या विषयासंबंधी अपराधीपणाची भावना दिसून येते, जी त्यांच्या जडणघडणचा परिपाक होती असे म्हणता येईल.

**संदर्भ :**

१.गांधी मो.क.,पटवर्धन सि.के,(अनु.)(२०१९). सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा, माणिक प्रकाशन, कोल्हापूर.

२. कित्ता

३. कित्ता

४. कित्ता

५. कित्ता

६.भोसले राजन (२०१३). अथातो कामजिज्ञासा, मनोविकास प्रकाशन, पुणे.

७.देशमुख अनंत (संपा.),(२०२०), रधो, समाजस्वास्थ मधील निवडक लेख, पद्मगंधा प्रकाशन, पुणे.

८. Gill S.S. (२००१). Gandhi A Sublime Failure,Rupa.Co,New Delhi,

९. भोसले राजन (२०१५).समग्र कामजीवन, मनोविकास प्रकाशन, पुणे.

१०. भोंडवे अविनाश (२०१५). तारुण्यगान, युवक युवतीने मैत्रीपूर्ण मार्गदर्शन, राजहंस प्रकाशन, पुणे.

११.कसबे रावसाहेब (२०२०). गांधी पराभूत राजकारणी आणि विजय महात्मा, लोकवाङ्मय गृह,मुंबई.

१२. कित्ता

१३. कित्ता

१४. कित्ता

१५. वानखडे चंद्रकांत (२०१९).गांधी का मरत नाही, मनोविकास प्रकाशन, पुणे